# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 12 March 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १२ मार्च २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- शेतकऱ्यांसोबत चर्चेतून मार्ग काढून शक्तीपीठ महामार्ग उभारणार–मुख्यमंत्र्यांची ग्वाही;विरोधकांना सहकार्याचं आवाहन
- बोगस प्रकरणांना प्रतिबंधासाठी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियमात सुधारणा–तत्काळ अंमलबजावणी सुरू
- लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीवरून विधानसभेत विरोधकांचा सभात्याग

आणि

- विविध गुन्हे दाखल असलेला सतीश भोसले ऊर्फ खोक्याला प्रयागराज इथून अटक

****

शक्तीपीठ महामार्गाला विरोध असणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत चर्चेतून मार्ग काढून हा महामार्ग उभारला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आज विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या महामार्गाविरोधात कोल्हापुरातले शेतकरी मुंबईत आझाद मैदानात आंदोलन करत असल्याचा मुद्दा उपस्थित केला, त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी शासनाची भूमिका मांडली. कोल्हापूरमध्ये या महामार्गाला शेतकऱ्यांचं समर्थन वाढत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या महामार्गामुळे मराठवाड्यासह राज्यातल्या अनेक जिल्ह्यांचं जीवनमान अभूतपूर्व बदलेल, असं सांगत, राज्याच्या विकासाबाबत महत्त्वाच्या असलेल्या या महामार्ग उभारणीसाठी विरोधकांनी सहकार्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दरम्यान, हा महामार्ग रद्द न केल्यास, प्रत्येक जिल्ह्यात मंत्र्यांच्या घरावर मोर्चे काढण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. मुंबईत आझाद मैदानावरील विराट मोर्चात सहभागी शेतकऱ्यांनी हा इशारा दिला. बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, धाराशिव आणि लातूरसह १२ जिल्ह्यातले शेतकरी या मोर्चात सहभागी झाले होते.

****

सामान्य दरापेक्षा अधिक व्याज परतावा देण्याचं आश्वासन, हा ९९ टक्के गुंतवणूक प्रकरणांमध्ये घोटाळा असतो, त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारच्या गुंतवणूक करू नये, असं आवाहन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केलं. टोरेस कंपनीनं गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला मुख्यमंत्री उत्तर देत होते. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

प्लास्टर ऑफ पॅरिस अर्थात पीओपी मूर्तींवरच्या बंदीसंदर्भात नेमलेल्या, डॉक्टर अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखालच्या समितीचा अहवाल येईपर्यंत पीओपी मूर्तींच्या परवानगीला मुदत देण्याची विनंती न्यायालयाला करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी स्थगन प्रस्ताव मांडत याबाबत शासनाची भूमिका मांडण्याची मागणी केली, त्यावर मुख्यमंत्री उत्तर देत होते. प्रदूषणाच्या बाजूनं कोणीही नाही मात्र कामगारांचा आणि मूर्तिकारांचा विचार करून ही समिती तांत्रिक मार्ग काढेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

****

दरम्यान, विधान परिषदेत विशेष बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कालची चर्चा आज पुढे सुरू झाली. सत्ताधारी सदस्यांनी केंद्र आणि राज्य सरकार करत असलेल्या उपाययोजनांकडे लक्ष वेधलं आणि या योजना अधिक बळकट करण्याचं आश्वासन दिलं. विरोधकांनी मात्र सरकारच्या कृषी विषयक धोरणांवर टीका करत, कांदा, सोयाबीनसारख्या पिकांना योग्य भाव देण्याची मागणी केली.

****

राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेचं काम लवकरच सुरू होऊन, ही योजना कार्यान्वीत करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं सांगितलं. त्या विधान परिषदेत बोलत होत्या.

****

बोगस प्रमाणपत्रांना प्रतिबंधासाठी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीला आजपासूनच प्रारंभ झाला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत याबाबतचं निवेदन दिलं. ही प्रमाणपत्रं देण्यासाठी तीनस्तरीय पडताळणी टप्पे निश्चित केले असून, सतरा मुद्यांची पूर्तता केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल, मात्र अर्जदारानं जोडलेली कागदपत्रं बनावट आढळल्यास आता तात्काळ फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या निर्णयामुळे, जन्म – मृत्यू नोंदणीची बनावट प्रमाणपत्रं मिळवणाऱ्या परदेशी नागरिकांवर आता अंकुश राहणार आहे.

****

विधानसभेत आज अर्थसंकल्पावरची चर्चा झाली. मोठ्या मताधिक्यानं निवडून आलेल्या महायुती सरकारनं अर्थसंकल्पातून जनतेला काहीही दिलं नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार वरुण सरदेसाई यांनी केली. आर्थिक गणित मांडण्यात सरकार अपयशी ठरलं आहे, अशी टीका त्यांनी केली.

काँग्रेसचे आमदार अमित देशमुख यांनी या चर्चेत बोलतांना, राज्यात होणारी गुंतवणूक कुठे होणार हे सरकारने स्पष्ट केलं पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. शेतीमाल वाहतूक विकास कार्यक्रम सरकारनं आखावा, मराठवाडा वॉटर ग्रीड या पाच वर्षांत पूर्ण करावं, अशा मागण्याही त्यांनी केल्या.

काँग्रेसचे आमदार विश्वजीत कदम यांनी, अंगणवाडी सेविकांची १८ हजार रिक्त पदं भरावीत आणि त्यांच्या मानधनात वाढ करावी अशी मागणी केली.

भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी या चर्चेत बोलतांना, अर्थसंकल्पातून राज्याची प्रगती होत असल्याचं दिसतं, मात्र राज्याचा महसूल वाढीकडे लक्ष देणं गरज असल्याचं मत व्यक्त केलं.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीवरून विरोधकांनी सभात्याग केला. या योजनेच्या लाभार्थी महिलांची संख्या दोन कोटी ४७ लाख झाल्याची

माहिती, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली. या योजनेच्या लाभार्थ्यांना २१०० रुपये मदत देण्याचा निर्णय योग्य वेळी घेतला जाईल, तसंच नमो सन्मान योजनेचा लाभ मिळणाऱ्या महिलांना एक हजार रुपये नमो सन्मान योजनेतून आणि पाचशे रुपये लाडकी बहीण योजनेतून दिले जातील, असं तटकरे यांनी सांगितलं. समाधानकारक उत्तर न मिळाल्याने प्रश्न विचारण्याची परवानगी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मागितली. मात्र विधानसभा अध्यक्षांनी ती फेटाळून लावत पुढचं कामकाज सुरू केलं. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी करत सभात्याग केला.

****

औष्णिक विद्युत केंद्रांमधून बाहेर पडणाऱ्या राखेची वाहतुक आणि इतर प्रकरणी नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाईचं आश्वासन पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिलं आहे. विधान परिषदेत सदस्य विक्रम काळे यांनी औष्णिक विद्युत केंद्रांमधून होणाऱ्या प्रदुषणाचा प्रश्न उपस्थित केला, त्यावर त्या उत्तर देत होत्या.

****

जालना जिल्ह्यात परतूर, मंठा आणि जालना तालुक्यात वॉटरग्रीड योजनेअंतर्गत महसुली थकबाकीच्या कारणावरून दोनशे गावांचा पाणी पुरवठा बंद केल्याचा मुद्दा आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मांडला. वसुलीसाठी महिनाभराचा वेळ द्यावा, मात्र पाणी पुरवठा तातडीने सुरू करावा, अशी मागणी लोणीकर यांनी केली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं ऊसाच्या ट्रकच्या अपघातात मृत व्यक्तींच्या वारसांना गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाकडून पाच लाख रुपये तर जखमींना उपचारासाठी ५० हजार रुपये वैद्यकीय खर्च देण्यात येईल, अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली. ते आज विधानसभेत बोलत होते. जिल्ह्यात कन्नड ते पिशोर मार्गावर काल झालेल्या या अपघातात सहा ऊसतोड कामगारांचा मृत्यू झाला, तर ११ कामगार जखमी झाले होते.

****

बुलडाणा जिल्ह्यात एका व्यक्तीला मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेला सतीश भोसले ऊर्फ खोक्या याला बीड पोलिसांनी प्रयागराज इथून अटक केली आहे. बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी ही माहिती दिली.

भोसलेवर खुनाच्या प्रयत्नाचे दोन, अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत एक आणि वन कायद्याअंतर्गत एक गुन्हा दाखल आहे. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातही काही प्रकरणं प्रलंबित आहेत.

****

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची पहिली सुनावणी आज केज न्यायालयात झाली. सुरक्षेच्या कारणामुळे आरोपींना सुनावणीसाठी न्यायालयात हजर करण्यात आलं नाही, त्याऐवजी, व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आरोपींची ओळख परेड पार पडली. या प्रकरणाची पुढची सुनावणी येत्या २६ मार्चला होणार आहे.

****

लातूर जिल्ह्यात कार आणि दुचाकीच्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला तर दुचाकीवरची एक महिला गंभीर जखमी झाली आहे. चाकूर तालुक्यात नांदगाव पाटी इथं ही दुर्घटना घडली.

****